# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

## महिला सबलीकरण समिती

# वार्षिक अहवाल

२०१९–२०२०

प्राचार्य

डॉ. एस. आर. टकले

समिती प्रमुख

डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## महिला सबलीकरण समिती
## वर्षिक अहवाल २०१९–२०२०

महिला सबलीकरण समितीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१९–२०२० मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

### महिला आरोग्य तपासणी शिबीर :–

महाविद्यालयातील विद्यार्थीनीमध्ये आपल्या आरोग्याविषयी जाणिव जागृती व्हावी म्हणून दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि. २८ ऑगस्ट २०१९ रोजी महिला आरोग्य तपासणी साठी फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. सिकंदर शेख व सिस्टर अनिता भालेराव हे आले होते. त्यांनी मुलींना कोणता आहार घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. सदरील शिबीरात ४० मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. ज्यात मुलींमध्ये हिमोग्लोबिनची कमतरता, पोटदुखी व कुपोषन आदी समस्या दिसून आल्या.

### पोस्टर स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा

राष्ट्रमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त दिनांक ३ जानेवारी २०२० रोजी ‘‘स्त्री पुरुष समानता’’ या विषयावर पोस्टर स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. पोस्टर स्पर्धेत ६ मुलींनी सहभाग घेतला होता. ज्या पैकी कु. दिपाली सुधाकर बोलकर व कु. हर्षदा खोंन्डे हीने अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच ‘‘आजची स्त्री सुरक्षित आहे का?’’ या विषयावरील वादविवाद स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेत आठ विद्यार्थीनींने सहभाग घेतला ज्यापैकी नकारात्मक बाजू मांडणारी कु. मृणाल मनोरकर व सकारात्मक बाजू मांडणारी कु. दिपाली बोलकर हिने अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. सदरील स्पर्धेचे परिक्षण प्रा. नितीन माळेगावकर व डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी केले होते.

### जागतीक महिला दिन

महाविद्यालयात दिनांक ११ मार्च २०२०रोजी जागतिक महिला दिनानिमित्त जेंन्डर सेन्सटायझेशन प्रोग्रॅम अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. रेखा मेश्राम सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, राजर्षी शाहू कॉलेज पाथ्री यांनी ‘‘महिला सुरक्षा काळाची गरज’’ या विषयावर उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

## महिला सबलीकरण समिती

शैक्षणिक वर्ष२०१९—२०२०

कार्यक्रमाची छायाचित्रे

महिला आरोग्य तपासणी शिबीर :— दि. २८ ऑगस्ट २०१९



डॉ. सिंकदर शेख  महाविद्यालयातील विद्यार्थीनीना 'आरोग्य व आहार' या विषयी मार्गदर्शन करताना.






डॉ. शेख विद्यार्थींनीची तपासनी करतांना, सिस्टर भालेराव व काथार हया औषधी देतांना.

सावित्रीबाई फुले यांची जयंती दिनांक ३ जानेवारी २०२०




सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करतांना महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी

वाद विवाद स्पर्धा :– दिनांक ३ जानेवारी २०२०



'आजची स्त्री सुरक्षित आहे का या विषयावरील वादविवाद स्पर्धेत आपली बाजू मांडताना कु. सिमा जाधव ही विद्यार्थीनी

## पोस्टर स्पर्धा दिनांक ३ जानेवारी २०२०



'स्त्री पुरुष समानता' या विषयावरील पोस्टर स्पर्धेत पोस्टर प्रेझेन्टेशन करतांना कु. दिपाली बोलकर



वाद विवाद व पोस्टर स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांसोबत परिक्षक डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. नितीन माळेगावकर आणि आयोजक डॉ. मंजुषा नळगीरकर.

जागतिक महिला दिनः— दि. ११मार्च २०२०




महिला सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. रेखा मेश्राम, व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व डॉ. मंजुषा नळगीरकर.

